संतान फर्नांडिस
वि.
दिगंबर चोपडेकर वगैरे
सीएनआय क्र.एमएचएसआय–०५–०००१२८२०२४

## निशाणी ६२ वरील आदेश

०१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. ५ यांनी तुर्तातूर्त ताकीद अर्ज विनाम्हणणे चालविण्याचा आदेश रद्द करणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र. ५ यांचे कथन संक्षिप्त रुपात असे आहे की, प्रतिवादी क्र. ५ यांना मोलमजूरीकरीता वारंवार बाहेरगावी जावे लागते व त्यांची तब्येत देखील वरचेवर बिघडत असते. त्यामुळे प्रतिवादी क्र. ५ हे त्यांच्या वकिलांना वेळेत भेटू शकले नाहीत व आवश्यक ती माहिती व कागदपत्रे देऊ शकले नाहीत. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी यांना म्हणणे दाखल करणेस विलंब झाला आहे. प्रस्तुतकामी दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यासाठी प्रतिवादी यांचे तुर्तातूर्त ताकीद अर्जावर म्हणणे न्यायालयासमोर येणे आवश्यक असून तसे न झाल्यास त्यांचे पैशाच्या स्वरुपात कधीही न भरुन येणारे असे अपरिमित स्वरुपाचे नुकसान होणारे आहे. सबब, न्यायाच्या पुर्ततेकरीता प्रतिवादी क्र. ५ यांना तुर्तातूर्त ताकीद अर्जावर म्हणणे देण्याकरीता झालेला विलंब माफ करुन त्यांना तुर्तातूर्त ताकीद अर्जावर म्हणणे सादर करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती प्रतिवादी क्र. ५ यांनी प्रस्तुत अर्जान्वये केलेली आहे.

०३. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज खोटा व खोडसाळ असून तो वादी यांना मान्य व कबूल नाही. प्रतिवादी क्र. ५ यांनी तुर्तातूर्त ताकीदअर्जावर म्हणणे देण्यास ३८९ दिवस म्हणजे १ वर्षे २४ दिवस एवढा प्रदिर्घ विलंब केलेला आहे. प्रतिवादी क्र. ५ यांनी विलंबाबाबत दिलेली कारणे समाधानकारक नसून आजारी असल्याबाबत वैद्यकीय पुरावा दाखल केलेला नाही. **मा. ना.सर्वोच्च न्यायालय यांनी सीसीसी विरुध्द व्हेईकल फॅक्टरी [२०१२ (३) महा.लॉ रिपोर्टर पृष्ठ क्र. ५७४]** या न्यायनिर्णयामध्ये कसल्याही वाजवी व पुरेशा कारणांशिवाय असमाधान विलंब माफ करण्यात येवू नये असे निर्देश दिलेले आहेत. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

०४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्जातील कारण व अभिलेखाचे परिक्षण केले

असता वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा जाहीर ठराव, कायमस्वरुपी व आज्ञार्थी ताकीदीकरीता तसेच वैकल्पिकरित्या कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. तसेच वादी यांनी निशाणी ५ कडे तुर्तातूर्त ताकीद अर्ज दाखल करुन प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी दाव्यासोबत जोडण्यात आलेल्या नकाशातील रस्त्यावर कोणतेही बांधकाम करु नये अथवा कोणत्याही प्रकारे अडथळा करु नये अशी विनंती केली आहे. वादी यांच्या दाव्याचे व तुर्तातूर्त अर्जाचे अवलोकन केले असता वादी यांनी दाव्यासोबत जोडलेल्या नकाशातील रस्त्यावर त्यांची वहिवाट असून त्यांना सदरील रस्त्याच्या अनुषंगाने इजमेंटरी हक्क प्राप्त झाले आहेत असे कथन केले आहे. त्यामुळे प्रस्तुतकामी वादी व प्रतिवादी यांचे सदर रस्त्याच्या अनुषंगाने हक्क असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. प्रतिवादी यांना प्रस्तुतकामी त्यांचे म्हणणे सादर करण्यास संधी न दिल्यास सदर रस्त्याच्या अनुषंगाने असणाऱ्या त्यांच्या हक्कांना देखील बाधा पोहोचणार आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या पृष्ठयर्थ **मा. ना.सर्वोच्च न्यायालय यांच्या सीसीसी विरुध्द व्हेईकल फॅक्टरी [२०१२ (३) महा.लॉ रिपोर्टर पृष्ठ क्र. ५७४]** या न्यायनिवाडाचा दाखल दिला आहे. परंतु प्रतिवादी क्र. ५ यांनी त्यांच्या अर्जामध्ये दिलेले कारण हे प्रथमदर्शनी वाजवी असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदरचा न्यायनिर्णय हा वादी यांना उपयुक्त असा नाही. नैसर्गिक न्यायतत्त्वानुसार कोणत्याही अर्जाचा निकाल गुणवत्तेवर अंतिमरित्या लावण्याकरीता व भविष्यातील दाव्यातील गुंतागुंत टाळण्याकरीता दोन्ही पक्षांना समान संधी देणे अपेक्षीत आहे. प्रस्तुत कामातील तथ्यांचा विचार करता प्रतिवादी क्र. ५ यांनी केलेल्या विलंबामुळे वादी यांना झालेला त्रासाची प्रतिवादी क्र.५ यांच्यावर खर्च बसूवन भरपाई होऊ शकते. त्यामुळे प्रतिवादी क्र.५ यांनी केलेल्या विलंबामुळे प्रस्तुत दावे कामी झालेला विलंब विचारात घेवून त्याअनुषंगाने प्रतिवादी क्र. ५ यांच्यावर खर्च बसविणे व सदर अटीवर प्रतिवादी क्र. ५ यांनी तुर्तातूर्त ताकीद अर्जावर म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन त्यांना संधी देणे न्यायोचित होणार आहे. या करीता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. निशाणी ६२ येथील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ५ यांच्याविरुध्द झालेला तुर्तातूर्त ताकीद अर्ज विना म्हणणे चालविण्याचा आदेश त्यांनी वादी यांना रक्कम रुपये २०००/- इतका खर्च देण्याच्या

अटीवर रदद्बातल करण्यात येतो.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

SOURABH JAYKUMAR CHIVATE
Digitally signed by SOURABH JAYKUMAR CHIVATE
Date: 2026.01.21 11:13:31 +0530

स्थळ – वेंगुर्ला
दिनांक – १३/०१/२०२६

**(एस.जे. चिवटे)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
वेंगुर्ला.